**विभागीय लेखापाल (परिविक्षाधीन) यांच्याकरीता निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदांच्या कालावधीत वाढ करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन निर्णय क्र.ईएसटी-२०२४/प्र.क्र.०२/प्रशासन-१**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ०२ एप्रिल, २०२६.**

**संदर्भ**:- १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०७/१६/आ.पु.क., दि.२७ जानेवारी, २०१७.
२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दि.११ जानेवारी, २०२४ व दि.०८ फेब्रुवारी, २०२४.
३) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. अअ /मुंमं / /का-८/१३४२, दि.१६ मार्च, २०२६.

**प्रस्तावना :-**

महालेखाकार (लेखा व हकदारी)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या कार्यालयात नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय लेखापाल (परिविक्षाधीन) यांना वेतन व भत्ते अदा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दि.११ जानेवारी, २०२४ व दि.०८ फेब्रुवारी, २०२४ अन्वये अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली होती. सदर विभागीय लेखापालांचा परिविक्षाधीन कालावधी महालेखाकार (लेखा व हकदारी)-II , महाराष्ट्र, नागपूर यांच्या कार्यालयामार्फत ०६ महिन्याच्या कालावधीसाठी वाढविण्यात आल्याने त्यांच्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदांचा कालावधी वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महालेखाकार (लेखा व हकदारी)-II , महाराष्ट्र, नागपूर यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या खालील विभागीय लेखापाल (परिविक्षाधीन) यांच्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदांचा कालावधी ०६ महिन्यांकरीता वाढविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **उमेदवाराचे नाव** | **शासन सेवेत रूजू झाल्याचा दिनांक** | **परिविक्षाधीन कालावधी समाप्त होण्याचा दिनांक** | **अधिसंख्य पदाचा वाढीव कालावधी** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | श्री.मोहित कुमार वर्मा (Shri.Mohit Kumar Verma) | ०६/११/२०२३ | ०५/११/२०२५ | ०६/११/२०२५ ते ०५/०५/२०२६ |
| २ | श्री.राकेश कुमार (Shri.Rakesh Kumar) | २०/११/२०२३ | १९/११/२०२५ | २०/११/२०२५ ते १९/०५/२०२६ |
| ३ | श्री.सुरर्ज कुशवहा (Shri.Suraj Kushwaha) | २९/११/२०२३ | २८/११/२०२५ | २९/११/२०२५ ते २८/०५/२०२६ |
| ४ | श्री.कमल गुप्ता (Shri.Kamal Gupta) | २१/१२/२०२३ | २०/१२/२०२५ | २१/१२/२०२५ ते २०/०६/२०२६ |

**२.** वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि २०१६/ प्र.क्र.७/१६/आ.पु.क., दि.२७ जानेवारी, २०१७ मधील तरतुदीनुसार उपरोक्त विभागीय लेखापालांसाठी निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदांचा कालावधी वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. परिविक्षाधीन कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकानंतरच्या दिनांकास सदर अधिसंख्य पदे आपोआप संपुष्टात येतील.

**३.** या बाबीवरील खर्च " मागणी क्र. एच-०६, २०५९ सार्वजनिक बांधकामे, ८० सर्वसाधारण , ००१-संचालन व प्रशासन (योजनेतर) (०८), कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (०८) (०२) कार्यान्वयन (२०५९-१२४५) " या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

**४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४०२१२३२३०२९१८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RANJIT
SHIVAJIRAO AHIRE

Digitally signed by RANJIT SHIVAJIRAO AHIRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT,
2.5.4.20=1abde6c83c28d6dbd9f52f359ea16d2e960f16f7ca457601da7303357626d5f5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7695265D501491899F1C290C5FAC1C7252F8D5F4D75CE48B86577435F1F4D615, cn=RANJIT SHIVAJIRAO AHIRE
Date: 2026.04.02 12:33:42 +05'30'

**( रणजित शि. अहिरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, मुंबई.
२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, मर्झबान पथ, मुंबई.
३) कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई

**प्रत-**

१) अपर मुख्य सचिव (सा.बां)/ सचिव (रस्ते)/ सचिव (बांधकामे) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४) महालेखाकार (लेखा व हकदारी)-II , महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
७) जिल्हा कोषागार / उपकोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८) वित्त विभाग (कार्यासन व्यय-११/ आकृतीबंध पुनर्रचना कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२.
९) कार्यासन सेवा-४/अर्थसंकल्प-३, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) कार्यासन प्रशासन-१ (निवडनस्ती)